# आंदोलनातील ढोंगीपणा घातक ठरेल - राजू परुळेकर

पुणे, दि. २७ (प्रतिनिधी) - भ्रष्टाचार निर्मूलनासाठी सुरू असलेले आंदोलन यशस्वी झाल्यास पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे. मात्र, सध्याच्या आंदोलनामध्ये पर्यायी व्यवस्थेचा अभाव आहे. कोणत्याही 'बाबा-बुवा'च्या आंदोलनामुळे व्यवस्था बदलणार नाही. त्यासाठी अभ्यासपूर्ण पावले उचलण्याची गरज आहे. मात्र, आंदोलनामध्ये ढोंगीपणा असेल तर तो घातक ठरेल, अशी टीका ज्येष्ठ पत्रकार राजू परुळेकर यांनी अण्णा हजारे यांचे नाव न घेता केली.

'श्रीएस भारत' संस्थेतर्फे आयोजित 'भ्रष्टाचारमुक्त समाज : क्रांतीची नवी दिशा' या विषयावर ते बोलत होते. निवृत्त बँक व्यवस्थापक दिलीप जोशी, शशांक जेवळेकर, विनय हर्डीकर यावेळी उपस्थित होते.

परुळेकर म्हणाले, गांधीजींच्या मार्गाने १९४७ मध्ये जे यश मिळविले, ते आता मिळविता येईलच असे नाही. त्यांचे नाव वापरून आंदोलन करणे हा ढोंगीपणा आहे. कोणत्याही 'बाबा-बुवा'मुळे व्यवस्था बदलणार नाही. भ्रष्टाचाराचा ६४ वर्षांचा वारसा तोडण्यासाठी ढोंग बाजूला ठेवले पाहिजे. गांधीजींनी आत्मक्लेशाचे हत्यार तयार केले, ते फक्त तेच वापरू शकत होते.

ते म्हणाले, देशामध्ये सध्या सर्वसामान्यांच्या मनामध्ये भ्रष्टाचाराविषयी प्रचंड चीड आहे. भ्रष्टाचाऱ्यांची वृत्ती बदलता येणार नाही. मात्र, राजकीय-प्रशासकीय यंत्रणेत बदल करता येतील. त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावा लागेल. त्यासाठी पैशांच्या चलनवलनाचा पाठपुरावा करणारी यंत्रणा निर्माण करणे, काही प्रमाणात घटनेत बदल करणे आवश्यक आहे. सरकार आणि यंत्रणेविषयी जनतेला आदर वाटला पाहिजे, अशी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे.

ते म्हणाले, भविष्याविषयीच्या असुरक्षिततेमुळे पैशांचा वायदेबाजारातील वापर वाढला आहे. त्यामुळे भ्रष्टाचाराला खतपाणी मिळते. उत्तरेतील राज्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे. त्या तुलनेत महाराष्ट्रात चळवळींमध्ये जनतेचा सहभाग कमी आहे. राज्यातील राजकीय प्रश्नांपेक्षा नागरिकांनी देशहिताचा विचार करून संघर्षासाठी पुढे आले पाहिजे.